| | | |
|---|---|---|
| दाखल दिनांक | - | ०१.०१.२०१८ |
| नोंद दिनांक | - | ०१.०१.२०१८ |
| निकाल दिनांक | - | ०५.०७.२०१८ |
| कालावधी | - | वर्ष महिने दिवस<br>०० ०६ ०४ |

दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, इचलकरंजी, जि. कोल्हापूर
यांचे न्यायालयात
(पिठासीन अधिकारी सतिष एन. पाटील यांचे समोर)

हिंदू विवाह अर्ज क्र.१/२०१८

[CNR:MHKO050000012018]

नि. १०/अ

श्री. निलेश किसन शिंदे,
व.व.२६, धंदा - मजूरी,
रा. शिंदे मळा, ज्ञानेश्वर नगर, तारदाळ,
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर. .. अर्जदार नं.१

आणि

सौ. पुनम निलेश शिंदे, व.व.२५,
लग्नापुर्वीचे नांव पुनम लिंबराज कोकोटे,
धंदा - घरकाम, रा. द्वारा श्री. लिंबराज बा. कोकोटे,
नारायण भगत यांचे घरी, तारदाळ,
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर. .. अर्जदार नं.२

अर्ज - हिंदू विवाह कायदा १९५५ चे
कलम १३(ब) प्रमाणे संमतीने
विवाह विच्छेदन होवून मिळणेबाबत.

विधिज्ञ उपस्थिती -

ॲड. एस.एस. मुजावर - अर्जदार नं.१ करीता.
ॲड. ए.पी. पटवा - अर्जदार नं.२ करीता.

-न्यायनिर्णय-
(दि. ०५.०७.२०१८ रोजी घोषीत)

अर्जदार क्र.१ व २ यांनी सदरचा अर्ज हिंदु विवाह कायदा १९५५ चे कलम १३(ब) प्रमाणे विवाह विच्छेदन होवून मिळणेसाठी केला आहे.

२. अर्जदारांची प्रस्तुत अर्जातील कथने थोडक्यात खालीलप्रमाणे -

अर्जदार नं.१ व २ यांचा विवाह हिंदू धर्म शास्त्रानुसार व जाती रुढी रिवाजानुसार दिनांक ३०.१२.२०१५ इ.रोजी तारदाळ येथे झाला आहे. लग्नानंतर उभयता पती-पत्नी म्हणून राहू लागले व अद्यापही त्यांचेमध्ये विवाहबंधन अस्तित्वात आहे. अर्जदार नं.१ व २ यांचेमध्ये वैचारीक मतभेद सुरु झालेमुळे अर्जदार नं.१ व २ हे माहे ऑक्टोबर, २०१६ पासून एकमेकांपासून विभक्त रहात आहेत. उभय अर्जदारांचे नातलग व मित्रमंडळीनी प्रयत्न करुनसुध्दा दोघांमधील वाद मिटला नाही. भविष्यातही ते पती-पत्नी म्हणून एकत्र येतील अशी त्यांना मूळीच खात्री नसल्याने त्यांनी सदरचा अर्ज हिंदु विवाह कायदा कलम १३(ब) खाली केला आहे व एकमेकांचे संमतीने विवाहाचे विच्छेदन होवून मिळणेची मागणी केली आहे.

३. अर्जदारांकडून त्यांनी केलेल्या अर्जातील मजकूराची पडताळणी केली असता त्यांनी मजकूर खरा व बरोबर असल्याचे सांगितल्यावरुन व उभय अर्जदार हे एक वर्षापेक्षा अधिका काळ विभक्त रहात आहेत व आप्तेष्ट व इतर मध्यस्थांकडून प्रयत्न होवूनसुध्दा ते परत पुन्हा एकत्र येवून पती-पत्नी म्हणून एकत्र राहण्याची शक्यता नसल्याचे सांगितले आहे. अर्ज दाखल झालेनंतर ६ महिन्याच्या कालावधीमध्ये अर्जदारांमध्ये एकत्र येवून पुन्हा पती-पत्नीचे नाते प्रस्थापित होवू शकलेले नाही. अर्जदार क्र.१ व २ यांनी त्यांच्या कथनाच्या समर्थनार्थ नि.७ व नि.८ वर आपआपली शपथपत्रे जबानी स्वरुपात दाखल केली आहेत. त्यांचे शपथपत्रातील व अर्जातील कथनांचे व दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अर्जदार क्र.१ व २ हे एक वर्षापेक्षा अधिक काळ वेगळे राहू लागले आहेत. वेगळे राहिलेनंतर त्यांचा पती-पत्नी म्हणून संबंध आलेला नाही. अर्जदारांमध्ये आता पुन्हा एकोपा होण्याची शक्यता नसल्याने त्यांनी उभयतांचे संमतीने विवाह विच्छेदन करुन एकमेकांपासून विभक्त होण्याचा निर्णय घेतला आहे.

४. वरील सर्व विवेचनांचा विचार करता प्रामुख्याने लक्षांत येते की, अर्ज दाखल झाले तारखेपूर्वी १ वर्षापेक्षा जास्त काळ अर्जदार एकमेकांपासून विभक्त रहात आहेत. त्यांना एकत्र येण्याविषयी ६ महिन्यांचा कालावधी देण्यात आला होता पण त्यानंतरही ते एकत्र येवू शकलेले नाहीत. तसेच अर्जदार नं.१ व २ यांनी विवाह विच्छेदनासाठी स्वेच्छेने व कोणाच्याही दबावाला बळी न पडता संमती दिल्याचे कबूल केले आहे. वरील सर्व बाबीं हया हिंदु विवाह कायदा कलम १३-ब च्या तरतुदींची पूर्तता करतात. म्हणून अर्जदार हे विवाह विच्छेदन करुन मिळण्यास पात्र ठरतात. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे -

## आदेश

१. अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. अर्जदार क्र.१) श्री. निलेश किसन शिंदे व २) सौ. पुनम निलेश शिंदे यांचे दिनांक ३०.१२.२०१५ इ.रोजी झालेल्या विवाहाचे हुकूमनाम्याच्या दिनांकापासून विवाह विच्छेदन करणेत येत आहे.

३. या अर्जाचा खर्च ज्याचा त्याने सोसणेचा आहे.

४. हिंदू विवाह कायदा कलम २३(४) अन्वये दोन्ही पक्षकारांना न्यायनिर्णयाची प्रत विनाशुल्क देण्यात यावी.

५. येणेप्रमाणे हुकूमनामा करणेत यावा.

सही/-

दिनांक :-०५.०७.२०१८.

( सतिष एन. पाटील )
दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, इचलकरंजी

"I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same word to word, as per the original Judgment/Order".

| | |
|---|---|
| Name of Stenographer | R.R. Patil |
| Name of Court | Shri. Satish N. Patil |
| Date of Dictation | 05-07-2018 |
| Judgment signed by the P.O.on | 05-07-2018 |
| Judgment uploaded on | 06-07-2018 |